## संक्षिप्त

### प्रा. गंगाधर अहिरे यांच्याशी संवाद

**नाशिक :** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिकरोड शाखेतर्फे संवाद सृजनाशी मालिकेतील २६ वे पुष्प शहरातील प्रसिद्ध लेखक, कवी तथा व्याख्याते प्रा. गंगाधर अहिरे गुंफणार आहेत. अहिरे यांची नऊ पुस्तके आणि कवितासंग्रह प्रकाशित आहेत. मुंबई येथील दुसऱ्या लोककला, लोकसाहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १२ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजता, नाशिकरोडच्या दत्त मंदिर चौकातील ऋतुरंग सभागृहात होणारा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून त्यासाठी जास्तीत जास्त साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मसाप शाखा कार्याध्यक्ष उन्मेष गायधनी, कोषाध्यक्ष ॲड. सुदाम सातभाई, प्रशांत केंदळे, दशरथ लोखंडे, शिवाजी म्हस्के आदींनी केले आहे.

### पालक उद्बोधन वर्ग

**नाशिक :** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जु. स. रुंगटा हायस्कूल, पुष्पावती रुंगटा कन्या विद्यालय, मोहिनीदेवी रुंगटा प्राथमिक विद्यामंदिर या शाळांमधील पालकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० विषयी उदबोधन वर्ग घेण्यात आला. मंचावर संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य सुभाष पवार, संकुल प्रमुख मिलिंद कचोळे, मुख्याध्यापिका जागृती टिळे, ज्योत्स्ना आव्हाड, सुनिता चौधरी, पालक शिक्षक संघ उपाध्यक्षा गायत्री क्षीरसागर आदी उपस्थित होते. व्याख्याते सुभाष पवार यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० मधील मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात झालेले बदल, समग्र प्रगती पुस्तक, मूल्यमापन हे समजावले. कचोळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेणे हे पालक म्हणून आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रियंका पाटील यांनी केले.

### अपंग विद्यार्थ्यांना मोफत चित्रपट

**नाशिक :** जिल्हा परिषद आणि सिटी सेंटर मॉल यांच्या वतीने ग्रामीण भागातील अपंग विद्यार्थ्यांना सितारे जमींपर चित्रपट मोफत दाखविण्यात आला. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी प्रथमच मल्टिप्लेक्समध्ये चित्रपट बघितला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांसमवेत पालक तसेच जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर कनोज उपस्थित होते.

### 'गोएसो'तर्फे आज व्याख्यान

**नाशिक :** येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सर डॉ. एम. एस. गोसावी यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त बुधवारी सकाळी साडेदहा वाजता गुरूदक्षिणा सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तालयोगी सुरेश तळवलकर 'कलापूर्ण जगण्याचे शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास सोसायटीच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून गोसावी यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात येणार आहे.

### स्वाभिमान बोट क्लबची कामगिरी

**नाशिक :** इंडियन कनो-कायकिंग (नौकानयन) असोसिएशन यांच्या सहकार्याने महाराष्ट्र संघटना आणि सांगली जिल्हा संघटना यांच्या सहकार्याने जत येथे आयोजित १६ व्या महाराष्ट्र राज्य कनो-कायकिंग अजिंक्यपद स्पर्धेत विल्होळी येथील स्वाभिमान बोट क्लबने चमकदार कामगिरी केली. क्लबच्या खेळाडूंनी एक सुवर्ण, दोन रौप्य, आणि पाच कांस्य पदकांची कमाई केली. क्लबचे अध्यक्ष सदानंद नवले यांनी खेळाडूंचे कौतुक केले. तुकाराम डांगे आणि वैभव नवले यांचे मार्गदर्शन लाभले.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांची उपासमार

## अकरा महिने वेतनाअभावी हाल; जिल्हा परिषदेचे दुर्लक्ष

**लोकसत्ता वार्ताहर**

**मालेगाव :** नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या १५० कंत्राटी कर्मचाऱ्यांचे तब्बल ११ महिन्यांचे वेतन रखडले आहे. संबंधित सेवा पुरवठादार या कर्मचाऱ्यांना दाद देत नाहीत. जिल्हा परिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. कात्रीत सापडलेल्या या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर त्यामुळे अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत जिल्ह्यातील १२२ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी १० वर्षांपासून बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेणे सुरू झाले आहे. त्यासाठी प्रत्येक केंद्रासाठी एक याप्रमाणे एकूण ११२ सफाई कर्मचाऱ्यांची सेवा पुरवठादार संस्थांकडून नियुक्ती करण्यात येत आहे. याशिवाय तीन वर्षांपासून नव्याने झालेल्या आरोग्य केंद्रांमधील सफाई कर्मचारी तसेच चालक, परिचर अशा पदांवर काम करण्यासाठी देखील कंत्राटी पद्धतीने सेवा घेणे सुरू झाले आहे.

जिल्ह्यात जवळपास १५० जणांची अशा कंत्राटी पद्धतीने बाह्यस्त्रोतांद्वारे सेवा घेतली जात आहे. १० वर्षात जिल्हा परिषदेकडून त्यासाठी तीन वेगवेगळ्या सेवा पुरवठादार संस्था नियुक्त करण्यात आल्या. मात्र, शासन निर्णय धाब्यावर बसवत या संस्थांकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शोषण केले जात असल्याच्या तक्रारी होत आहेत. यापूर्वी सीएससी ई-गव्हर्नन्स या दिल्लीस्थित संस्थेला कर्मचारी सेवा पुरविण्याचा ठेका देण्यात आला होता. हा ठेका रद्द करून ऑक्टोबर २०२४ पासून जिल्हा परिषदेकडून छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार संस्थेकडे हे काम सोपविण्यात आले.

सीएससी ई-गव्हर्नन्स या संस्थेने मार्च २०२४ ते ऑक्टोबर २०२४ असे आठ महिन्यांचे वेतन या कर्मचाऱ्यांना दिलेले नाही. सेवा पुरवठादार संस्थेचा ठेका रद्द होऊन आता सव्वा वर्षाचा कालावधी उलटल्यावरही रखडलेले हे वेतन मिळू शकलेले नाही. दुसरीकडे नव्याने नियुक्त झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार संस्थेने देखील पूर्वीसारखाच कित्ता गिरविणे सुरू केले आहे. या संस्थेनेही कर्मचाऱ्यांचे तीन महिन्यांचे वेतन थकविले आहे.




### कर्मचाऱ्यांकडून तक्रार

नियमानुसार सेवा पुरवठादार संस्थेने कंत्राटी कामगारांना दर महिन्याच्या १० तारखेच्या आत वेतन देणे बंधनकारक आहे. या अटीचा भंग झाल्यास दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश आहेत. मात्र त्याचे पालन होत नाही. याशिवाय कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार सफाई कर्मचाऱ्यांना दरमहा १२ हजार ४७३ रुपये वेतन देणे आवश्यक आहे. मात्र, त्यांना दरमहा केवळ १० हजार २०० रुपये दिले जातात, अशी तक्रारदेखील या कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

रखडलेले वेतन व अन्य प्रश्नांसंदर्भात जिल्हा परिषद प्रशासन तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे वेळोवेळी गाऱ्हाणी मांडण्यात आली आहेत. प्रत्येक वेळी केवळ आश्वासन देऊन बोळवण केली गेली. यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक विवंचनेला तोंड द्यावे लागत आहे. अशा स्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा आणि मुलांच्या शिक्षणासाठी कुठून अर्थसाहाय्य घ्यावे, असा प्रश्न पडला आहे.

**– दामू यादव, कंत्राटी कर्मचारी**

# दोन घरफोड्यांमध्ये पावणेतीन लाखांचा ऐवज लंपास

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**




**नाशिक :** शहरात घरफोडीचे सत्र कायम असून दोन घटनांध्ये चोरट्यांनी पावणेतीन लाखांचा ऐवज चोरला. पहिली घटना चुंचाळे शिवारातील घरकुल योजनेत घडली. याबाबत शिल्पा गाडेकर यांनी तक्रार दिली.

गाडेकर कुटूंबिय चार दिवसांसाठी बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी बंद घराच्या खिडकीचे गज वाकवून चोरी केली. कपाटातील १७ हजार रुपये आणि दागिने असा सुमारे ३८ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरला. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी घरफोडी जेलरोड भागात झाली. याबाबत यतीन लांडे (ब्रिजनगर, पंचक) यांनी तक्रार दिली. लांडे कुटूंबिय बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी घरातून सव्वादोन लाख रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तडीपारास अटक

तडीपारीची कारवाई करूनही शहरातच फिरणाऱ्या संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले. मध्यवर्ती गुन्हे शाखेने जेलरोड भागात ही कारवाई केली. राहूल उर्फ पाप्या चाफळकर (३१, संजय गाधीनगर, जेलरोड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. चाफळकर याच्या गुन्हेगारी कारवाया रोखण्यासाठी पोलिसांनी त्याला दोन वर्षांसाठी शहर व जिह्यातून तडीपार केलेले असताना तो शहरातच फिरत होता. पोलिसांनी त्याला त्याच्या घर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. याबाबत अंमलदार प्रजित ठाकूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दोन पेट्रोल पंपांना नोटीस

**नाशिक :** वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत येवला तालुक्यातील अंदरसूल येथील दोन पेट्रोल पंपांची तपासणी करण्यात आली असता काही त्रुटी आढळून आल्याने त्यांना नोटीस देण्यात आली. तसेच एका वजन काटा आस्थापनेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. एका कृषी सेवा केंद्र चालकाविरुध्द खटला दाखल करण्यात आला. नियमाचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरुध्द वेगवेगळ्या प्रकारची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वैध मापनशास्त्र नाशिक विभागाचे सहनियंत्रक नरेंद्रसिंह मोहनसिंह यांनी दिली. प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोहिमेत येवला तालुक्यातील अंदरसूल येथील मे. काले पेट्रोल पंपाची तपासणी केली असता, पंपावरील आठ नळ्यांपैकी सहामध्ये त्रुटी आढळून आल्या. त्यांच्या पुनर्पडताळणीसाठी मनमाड विभागाच्या वैधमापन शास्त्र निरीक्षकांमार्फत नोटीस देण्यात आली.

मे. काले वे ब्रिज या नावाने ५० टन क्षमतेचा वाहन काटा आणि मे. काले ॲग्रो सर्व्हिसेस या नावाने कृषी सेवा केंद्र असून त्यांचीही तपासणी करण्यात आली. वाहन काट्यावर ठेवलेली २० किलो क्षमतेची वजने विहित मुदतीत प्रमाणित व मुद्रांकन केली नसल्याचे आढळून आले.



### नियम न पाळणाऱ्या वाहनांवर कारवाई...

**प्रादेशिक परिवहन विभाग आणि नाशिक वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने नियमबाह्य काळी काच असलेल्या आणि विचित्र नंबरपट्टी असलेल्या वाहनांवर गंगापूर नाका परिसरात कारवाई करण्यात आली.**

(छायाचित्र : यतीश भानू)

# पाण्याअभावी सार्वजनिक स्वच्छतागृह बंद

## रविवार पेठेतील रहिवाशांची गैरसोय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** शहरातील मध्यवर्ती आणि व्यापारी भाग असलेल्या रविवार पेठ परिसरातील स्वच्छतागृह दीड महिन्यांपासून पाणी नसल्याने बंद ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, सध्या संततधार पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी पाणी साचले असताना स्वच्छतागृह मात्र पाण्याअभावी बंद ठेवावे लागत आहे. यामुळे परिसरातील दुकानदार, व्यापारी, रहिवाशांची मोठ्या प्रमाणावर कुचंबणा होत आहे. रविवार पेठ हा संपूर्ण दुकाने, व्यापारी परिसर आहे. त्यामुळे सकाळपासून रात्री उशिरापर्यंत परिसरात नागरिकांची कायम वर्दळ असते. रविवार पेठेतील घनकर लेनमध्ये छपाई व्यावसायिकांची संख्या अधिक आहे. दूरवरुन अनेकजण कामासंदर्भात या व्यावसायिकांकडे येत असतात. या परिसरात एकमेव असलेले सार्वजनिक स्वच्छतागृह दीड महिन्यांपासून पाणी नसल्याने बंद करण्यात आले आहे. तशी सूचना देणारा फलकही त्याठिकाणी लावण्यात आला आहे. स्वच्छतागृह बंदमुळे नागरिकांची कुचंबणा होत आहे. मधुमेही रुग्णांना वारंवार स्वच्छतागृहात जावे लागते. परंतु, स्वच्छतागृह बंदचा त्यांना खूपच त्रास सहन करावा लागत आहे. यंदा मे महिन्यापासूनच शहर परिसरात पावसाला सुरुवात झाली. सततच्या पावसामुळे गंगापूर धरणासह सर्व धरणसमूहात चांगला जलसाठा झाला आहे. मात्र नाशिक महापालिकेला पाणी तुटवडा भासत आहे. पाण्याअभावी स्वच्छतागृह बंद असल्याचा फलक लावून नागरिकांची गैरसोय करण्यात आली आहे. यशवंत मंडईत स्वच्छतागृह होते. परंतु, मंडईचे पाडकाम सुरु असल्याने त्या स्वच्छतागृहाचा वापर बंद करण्यात आला आहे. एकमेव स्वच्छतागृह आणि तेही पाण्याअभावी बंद असल्याने नागरिकांना पायपीट करून दूरवर जावे लागते. याबद्दल यापूर्वीही तक्रारी करण्यात आल्या असल्या तरी कार्यवाही झालेली नाही. परिसरातील नागरिकांकडून स्वच्छतागृह त्वरित सुरू करण्याची मागणी केली जात आहे.




# मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे पाच लाख सदस्य

## सर्वाधिक नोंदणी असलेले पहिले राज्य विद्यापीठ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाने पाच लाख सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला आहे. संघ स्थापना झाल्यापासुन पावणेपाच वर्षाच्या कालावधीत या माजी विद्यार्थी संघाकडे पाच लाख सहा हजार ८५७ विद्यार्थ्यांनी सदस्यता नोंद केली आहे. भारतातील सर्व विद्यापीठांच्या तुलनेत सर्वाधिक माजी विद्यार्थी सदस्य नोंदणी असलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे देशातील पहिले राज्य विद्यापीठ ठरले आहे.

१९८९ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर आजपर्यंत ५५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध शिक्षणक्रमांच्या पदव्या प्राप्त केल्या आहेत. २०२० मध्ये विद्यापीठात माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. त्यात सामील होण्यासाठी विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना संकेतस्थळ उपलब्ध करून दिले. त्यात त्यांनी कोणत्या विद्याशाखेतून कोणता शिक्षणक्रम कधी पूर्ण केला, सध्या ते कोणत्या आस्थापनेत कोणत्या पदावर काम करत आहेत, याबाबतची माहिती देत सदस्य होण्याचे आवाहन केले होते.

माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांच्याकडे या विभागाची धुरा देण्यात आली होती. डॉ. साबळे यांनी माजी विद्यार्थी संस्थेची धर्मादाय आयुक्त कार्यालयात रीतसर नोंदणी करून घेतली. १० सप्टेंबर २०२० रोजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघास नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले. यानंतर माजी विद्यार्थ्यांचा शोध घेत त्यांना सदस्य होण्यासाठी आवाहन केले गेले. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत माजी विद्यार्थ्यांचे संघटन वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच त्यांच्या निरनिराळ्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले.

माजी विद्यार्थी संघाला बळ देण्यासाठी माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर, डॉ. माणिकराव साळुंके, प्रा. ई. वायुनंदन तसेच कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, डॉ. प्रकाश देशमुख, भटूप्रसाद पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आणखी मोठ्या प्रमाणात विद्यापीठाशी जोडण्यासाठी जगभरातील माजी विद्यार्थ्यांचा लवकरच मेळावा आयोजित करण्याचा मनोदय असल्याचे संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्यासाठी कुलगुरूंसह संस्थेचे सदस्य तथा व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या डॉ. संजीवनी महाले, उपाध्यक्ष डॉ. गोविंद कतलाकुटे, खजिनदार कविता देव, डॉ. नितीन ठोके, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, धावपटू कविता राऊत, राहुल खैरनार यांचेही सहकार्य लाभले.

दरम्यान, मुक्त विद्यापीठातून कोणताही शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी वायसीएमओयूएएलयूएमएनआय.ओआरजी या संकेतस्थळास भेट देवून आपली नोंदणी करावी, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.




### माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. माजी विद्यार्थ्यांची एकमेकांशी ओळख व्हावी, विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचावी, नवीन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांचा फायदा व्हावा या उद्देशाने माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या या माजी विद्यार्थी संस्थेचे पाच लाख सहा हजार ८५७ एवढे सदस्य झाले आहेत.

# वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन

## राष्ट्रवादीची तक्रार

**नाशिक :** वाहनधारकांकडून वाहतूक नियमांची सर्रासपणे पायमल्ली होत असल्याने अपघातांमध्ये निरपराधांना प्राण गमवावे लागत आहेत. रस्त्यावर धावणारी वाहने सुरक्षित आहेत की नाही, त्यांच्याकडून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची सातत्याने तपासणी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बागलाण तालुकाध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद जाधव यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली.

मालवाहतूक, खासगी आणि प्रवासी वाहने यांच्या चारही बाजूंनी शासनाने प्रमाणित केलेले रेडीयम रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक असतांना, नियमांची पायमल्ली होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. बैठकीत सोनवणे यांच्या हस्ते जाधव यांचा पुस्तक व रोप भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संदीप भामरे, दिंगबर सोनवणे, नंदराज देवरे, रवींद्र शिंदे, हेमंत मगर, रणधीर मोरे, वसंतराव खैरनार उपस्थित होते.

# नांदगावसाठी वळण रस्त्याची गरज

**नांदगाव :** शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर सध्या प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. या कोंडीतून नांदगावकरांची सुटका करण्यासाठी शहराबाहेरून वळणरस्ता करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवर विशेषतः गुरुवारी आठवडे बाजाराच्या दिवशी शनिमंदिर पूल ते न्यू इंग्लिश स्कूल या दरम्यान नेहमीच वाहतूक कोंडी होते. नांदगाव शहरातून मालेगाव, मनमाडच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरील शाळा, महाविद्यालय, लॉन्स, राष्ट्रीयकृत बँका तसेच आजी - माजी आमदारांची संपर्क कार्यालये, विविध व्यावसायिक कार्यालये असल्याने दिवसभर या भागात मोठी वर्दळ असते. विशेषतः सकाळी शाळा भरण्याच्या आणि संध्याकाळी शाळा सुटण्याच्या वेळेत प्रचंड गर्दी या भागात निर्माण होते. त्याचा परिणाम वाहतूक कोंडीवर होत असतो. शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेले गांधी चौक, स्टेट बँक, टपाल कार्यालय, रेल्वे स्थानकाजवळचा परिसर आणि बाजारपेठ परिसर या सर्व ठिकाणी वाहनांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे.

रस्त्यांची रुंदी कमी असल्याने वाहनधारकांना अडथळे निर्माण होतात. नांदगाव शहर हे नाशिक, चाळीसगाव, मनमाड, येवला आणि मालेगाव या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा मध्यवर्ती बिंदू आहे. त्यामुळे आंतरजिल्हा वाहतूक देखील मोठ्या प्रमाणावर होत असते. यामध्ये विशेषतः अवजड वाहनांचा (मालमोटार, ट्रॅक्टर, कंटेनर ) समावेश आहे. ही वाहतूक थेट शहरातूनच मार्गक्रमण करत असल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेवरही प्रश्न निर्माण होत आहे. काही दिवसांपूर्वी शहरातील रेल्वेपुलाचा कठडा कोसळल्याने नांदगावमार्गे वाहतूक वळविण्यात आली होती. त्यावेळी शहरातील रस्त्यावर अनेक अपघात झाले होते. दररोजचा त्रास दूर करण्यासाठी नांदगाव शहराबाहेरून वळण रस्ता होणे गरजेचे आहे. वळण रस्ता झाल्यास शहरावर पडणारा वाहतूकीचा ताण कमी होईल.

# शेतातील साहित्य चोरणारे दोघे ताब्यात

**नाशिक :** शेतातील साहित्य चोरून रिक्षातून घेऊन जाणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. संशयितांच्या ताब्यातून रिक्षासह सळई, तार आणि इतर असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याबाबत दत्तू शिंदे (५०, जुना पाझर तलाव, शिंदे वस्ती, आडगाव शिवार) यांनी तक्रार दिली. धर्मेंद्र बोंडवे (३५) आणि सद्दाम कोकणी (२४, दोघे रा. वसंतदादानगर, आडगाव शिवार) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शिंदे यांची आळंदी कालवा भागात शेती आहे. शेतातील द्राक्ष बाग मोडण्यात आल्याने लोखंडी सळई आणि तार उघड्यावर काढून ठेवण्यात आली होती. संशयित शेती उपयुक्त साहित्य रिक्षात भरताना आढळले. स्थानिक शेतकऱ्यांनी धाव घेतल्याने दोघे संशयित हाती लागले.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए-ई-लिलाव स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींस वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली- ११०००१, फोन्स: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक: ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लॅण्डमार्क, तनिश्क शोरुमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शहारणपूर रोड, नाशिक- ४२२००२, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. ''डी'' मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. ''सी''मध्ये वर्णिल्यानुसार) मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.